# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

नविन प्रशासकीय इमारत,ए.बी.बी. सर्कल, महात्मा नगर, त्र्यंबक रोड, नाशिक-7
दूरध्वनी क्र. 0253-2591010, e-mail : gadzpnsk@gmail.com

विकास प्रेरणा
जिल्हा परिषद, नाशिक


---

**वाचा** : 01. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील कामापुरता आदेश क्र.साप्रवि/परिषद/210/2026, दि.19.05.2026 अन्वये विषय क्रमांक 11 नुसार प्राप्त मंजुरी.

02. दै.सामना (राज्यस्तरीय), दै. महाराष्ट्र टाईम्स्., दै. लोकमत व दै.लोकमंथन (जिल्हास्तर) या वर्तमानपत्रात दि.24.06.2026 रोजी प्रसिध्द जाहिरात.

03. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील दि.08.07.2026 चे पत्रानुसार अर्ज सादर करण्यास दिलेली मुदतवाढ.

04. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्र.जिपना/साप्रवि/ न्याया.कक्ष/190/ 2026, दि.05.08.2026

05. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्र. जिपना/साप्रवि न्याया. कक्ष/192/2026, दि.11.08.2026

06. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्र. जिपना/साप्रवि/ न्याया.कक्ष/193/ 2026, दि.11.08.2026

07. मुलाखत समितीचे दि.13.08.2026 रोजीचे Google Meet वर Online व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त व त्याव्दारे प्राप्त शिफारशी.

08. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील मंजुर टिप्पणी दि.27.08.2026

---

**आदेश**

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
क्र.जिपना/साप्रवि/न्याया.कक्ष/201/2026
नाशिक, दि.27.08.2026

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती, क्षेत्रीय स्तरावरील प्रलंबित असलेल्या व नव्याने दाखल होणाऱ्या दाव्यांसंदर्भात विविध स्तरावरील प्रकरणांमध्ये नाशिक जिल्हा परिषदेची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांबाबत कायदेशीर सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणेकामी सन 2026-2029 या कालावधीकरिता वकील पॅनलवर विधीतज्ञ (वकीलांची) नेमणूक करणेकामी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील वाचा क्र.01 नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार वाचा क्र.02 येथील वर्तमानपत्रांव्दारे जाहिरात देण्यात आली होती, जिल्हयात पर्जन्यवृष्टी असल्याने, वाचा क्र.03 अन्वये अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

02. प्राप्त अर्जांची तसेच अर्जांचे अनुषंगाने संगणकीयकृत एकत्रित माहितीची तपासणी करणेसाठी वाचा क्र. 04 येथील आदेशान्वये कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहायक प्रशासन अधिकारी असे 02 अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती, वाचा क्र. 05 अन्वये मुलाखत समिती गठीत करण्यात आली होती.

03. वाचा क्र.06 नुसार वकील पॅनल (सन 2026-2029) करिता वकील निवडीसाठी दिनांक 13.08.2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपासुन Google Meet वर Online व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे आयोजित करणेबाबत सर्व अर्जदार (वकील) यांना कळविण्यात आले होते.

04. वाचा क्र.07 नुसार मुलाखत समितीचे दि.13.08.2026 रोजीचे Google Meet वर Online व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त व त्याव्दारे प्राप्त शिफारशीनुसार सदर आदेशाच्या दिनांकापासून किमान 03 वर्षाकरिता किंवा पुढील पॅनल नेमणुकीचा आदेश पारित होईपावेतो वकील पॅनलची स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | न्यायालय | उमेदवाराचे (वकीलाचे) नांव | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | श्री. कदम सुहासकुमार एस. | 9899742959 / 9899742959<br>9823838065/ (Offi.) 0120-4313769 |
| 2 | | श्री. दाहत प्रशांत रामदास | 9540638878/ 011-22242500 |
| 3 | | श्री. चपळगावकर सिध्दार्थ सारंग | 8369128315 |

| अ.क्र. | न्यायालय | उमेदवाराचे (वकीलाचे) नांव | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | मा. उच्च न्यायालय, मुंबई | श्री. सखदेव रोहित प्रमोद | 9869283047 |
| 2 | | श्री. जंगले अभिजित विठ्ठलराव | 9922504506 |
| 3 | | श्री. बोडके दिलीप भैरु | 9820191250 |
| 4 | | श्री. सुतार धैर्यशील विजय | 9920490380 / 9112607777 |
| 5 | | श्री. देवकर पंकज पोपटराव | 9960315456 / 9773567851 |
| 6 | | श्री. सावगावे अजित महादेव | 9820576382 |
| 7 | | श्रीमती देशमुख चैत्राली आनंद | 9766363427 |
| 8 | | श्रीमती मारवाडी खुशबु घनश्याम | 9011593141 / 9967517813 |
| 9 | मा. उच्च न्यायालय, मुंबई व कोल्हापूर खंडपीठ | श्री. पाचुंदकर रविंद्र सोनबा | 9075857557 / 8888859009 |
| 10 | छ.संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठ | श्री. बोंदर उत्तम बाजीराव | 9422201849 |
| 11 | | श्री. पवार ज्ञानेश्वर बाबासाहेब | 9881760293 |
| 12 | नागपूर खंडपीठ | श्री. जयपूरकर भेशेषकुमार नामदेवराव | 9822229455 |
| 13 | | श्री. कापगते अविनाश यशवंते | 9822943501 |

| अ.क्र. | न्यायालय | उमेदवाराचे (वकीलाचे) नांव | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा न्यायालय, नाशिक/ औद्योगिक/ कामगार व दिवाणी न्यायालये (कनिष्ठ/ वरिष्ठ स्तर) | श्री. सानप निलेश भास्कर | 9823931424 |
| 2 | | श्री. अमृतकर योगेश रमेश | 9421508294 |
| 3 | | श्री. पाटील राजेंद्र पांडुरंग | 9850445529 |
| 4 | | श्री. कोकाटे शरद भास्कर | 7588487773 |
| 5 | | श्री. लांजेकर मंगेश चंद्रकांत | 9975261739 |
| 6 | | श्रीमती पालवे स्वाती सुरेंद्र | 9860295995 |
| 7 | | श्री. शेटे गुलाब भास्कर | 9405001109 |
| 8 | | श्री. वनकर प्रकाश उध्दव | 9975748366 / 8669128941 |
| 9 | | श्रीमती हातोळकर रेणुका जयंत | 9284540113 |
| 10 | | श्रीमती आंबरे मनिषा श्रीकांत | 7028795424 |
| 11 | | श्रीमती खाडे शुभदा संतोष | 7972351508 / 7841847875 |
| 12 | जिल्हा न्यायालय, नाशिक / दिवाणी न्यायालये (कनिष्ठ/ वरिष्ठ स्तर) | श्री. उपासनी श्रीकांत शरद | 9270048083 /0253-2373083 |
| 13 | | श्रीमती मंडाले हेमांगी अरविंद | 9834079967 |
| 14 | जिल्हा न्यायालय, नाशिक/ कामगार/औद्योगिक न्यायालय | श्रीमती मारवाडी खुशबु घनश्याम | 9011593141 / 9967517813 |
| 15 | जिल्हा न्यायालय, नाशिक/ नाशिकरोड/चांदवड/ पिंपळगांव(ब)/ येवला/ सिन्नर | श्री. गारे सुदाम शांताराम | 9021647194 |
| 16 | औद्योगिक/ कामगार न्यायालय, नाशिक | श्रीमती गोरे वृंदा युवराज | 9607569166 / 9422764303 |
| 17 | अपर जिल्हा न्यायालय, मालेगाव व दिवाणी न्यायालय, मालेगाव | श्री. निकम सुधाकर बाबुराव | 9923974104 |
| 18 | | श्री. कुलकर्णी पराग पुरुषोत्तम | 9423486550 / 7972561228 |

**वकील पॅनलवर नियुक्त वकीलांसाठी अटी व शर्ती तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

1) या करारनाम्याचा कालावधी नेमणुकीचे आदेश निर्गत झाल्याचा दि.27.08.2026 पासुन ते दि.26.08.2029 कार्यरत असे पर्यंत बंधनकारक राहील.

2) नाशिक जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबींबाबत तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

3) जिल्हा परिषद हिताचे संवर्धन होईल याद्दष्टीने प्रशासकीय बाबींची माहिती घेऊन तसेच आवश्यक तो कायद्याचा आधार घेऊन जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण क्षमतेने व प्रभावीपणे न्यायालयात मांडणे.

4) सेवाविषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी/महसूल विषयक प्रकरणे तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती बाबत सर्व प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

5) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्याच्या दृष्टीने सरकारी वकिलांकडे पाठपुरावा (जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी) व संबंधित अधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन आवश्यक ते प्रतिज्ञापत्र/शपथपत्र तयार करणे.

6) जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीकोनातून न्यायालयीन प्रकरणे व कायदेशीर मार्गदर्शनाबाबत आवश्यक ती गोपनियता बाळगणे.

7) ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासन विरोधात निकाल झालेले असतील, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करुन गुणवत्तेनुसार वरिष्ठ न्यायालयाकडे अपिल दाखल करणे संदर्भात कायदेशीर मार्गदर्शन करणे.

8) पॅनलवरील एखादा वकील त्यांचेकडे सोपविलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या बाबतीत जिल्हा परिषदेची बाजू पुरेशा प्रभावाने मे. न्यायालयामध्ये मांडत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यांचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रद्द करण्यात येऊन त्यांची पॅनल वरील नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल.

9) पॅनल नियुक्त करण्यात आलेल्या वकीलांना न्यायालयीन दाव्याच्या संदर्भातील विषय, सदर विषयाच्या कामकाजातील नैपुण्यता इ. बाबींचा विचार करुन दावे सुपूर्द केले जातील.

10) जिल्हा परिषद स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या न्यायालयीन दाव्यांचा आढावा संदर्भातील सभांना उपस्थित राहून त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या दाव्यांच्या सद्य:स्थितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

11) न्यायालयीन प्रकरणा संदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसांच्या आंत प्रत्येक सुनावणीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

12) जिल्हा परिषद, नाशिक विरोधात कोणत्याही न्यायालयात पॅनल मधील वकीलांना केस चालविता येणार नाही.

13) तालुका स्तरावरील न्यायालयातील केसेस चालविण्याकामी जिल्हा ते तालुका या दरम्यानचे न्यायालयातील केसेस चालविण्याकामी जिल्हा ते तालुका दरम्यानचे प्रवास भाडे अनुज्ञेय राहील.

14) खर्चाबाबत त्याची पावती देयकासोबत जोडणे आवश्यक राहील. अशी पावती पडताळणी करताना त्यास मंजुरी देणे, नाकारणे किंवा दुरूस्ती करून मंजुरी देणे याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील. कोर्ट फी व स्टॅम्प डयुटीबाबत प्रमाणपत्र द्यावे. तसेच वकील फी बाबत स्वतंत्र मागणी पत्रक, आगाऊ स्टॅम्प पावती आणि दाव्याचे निकालपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

15) पॅनलवरील वकीलांना केसचा अंतिम निकाल लागल्यानंतर वकील फी अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकरणामध्ये वकील फी किंवा अनुषंगिक खर्च होत असल्यास कोणत्याही सबबी खाली खर्च करण्यास अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

16) प्रत्येकी प्रकरणी अतिरिक्त वकीलाची नेमणुक करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुसऱ्या वकीलास चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढणे याबाबत अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी केंव्हाही घेऊ शकतील.

17) प्रकरणी वकालतनामा घेऊन चालविण्यास स्विकारल्यानंतर सर्व संबंधीत माहिती लिखीत स्वरूपात देण्यात यावी. अधिक आवश्यक माहिती कागदपत्र संबंधीत विभागास पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष संपर्क करून उपलब्ध करून घ्यावी.

18) विषयाची काही अडचण असल्यास कार्यालय प्रमुखांना लिखीत स्वरूपात पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष भेटून सांगण्यात यावी.

19) कार्यालयाने नेमणुक केलेल्या वकीलाकडे दिलेली प्रकरणे कोणतीही सबब सांगुन परत करता येणार नाही आणि अपरिहार्य कारणास्तव अपवादात्मक स्थितीत प्रकरण परत करावयाचे कारण लेखी स्वरूपात कळविण्यात यावे.

20) जिल्हा परिषदेशी संबंधीत दोन न्याय प्रविष्ठ दाव्यांचा निकाल विरोधात गेल्यास, वारंवार तारखेस न्यायालयात गैरहजर राहिल्यास, प्रकरणाची कार्यालयास माहिती वेळोवेळी न दिल्यास, कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पूर्वसुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनल मधुन कमी करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

21) वकील पॅनल मधील वकीलास कोणत्याही कारणास्तव पॅनल मधुन कमी केल्यास त्यांचेकडे देण्यात आलेली न्यायालयीन प्रकरणे पूर्ण माहिती, कागदपत्र, नस्ती, पॅनलमधुन कमी केल्याचे पत्र मिळाल्यापासुन (10) दहा दिवसांचे आंत कार्यालय निर्देश करील त्या वकीलाकडे अथवा संबंधीत विभाग प्रमुख यांचेकडे परत करण्यात यावीत. माहिती कागदपत्रे, नस्ती परत केली नसल्यास त्यांचेविरूध्द बार कॉन्सिल वकील पंजीकरण विभाग किंवा अन्य न्यायालयीन विभागात या विषयाची तक्रार नोंदवुन आवश्यक सर्व उपाय करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

22) जिल्हा परिषदेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील न्यायालयीन दाव्यांमध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरणपरत्वे वाढ करण्याचे अधिकार मा. स्थायी समिती, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील. पॅनल मधील विशिष्ट वकील अथवा पॅनल व्यतिरिक्त विधीतज्ञांची (वकीलांची) नियुक्ती करण्याचा व त्यांची फी ठरविण्याचा अधिकार मा. स्थायी समितीला राहतील तसेच खालील नमुद वकील फी मध्ये कधीही बदल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

23) कोणत्या वकीलास कोणते व किती दावे द्यायचे याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असून या संदर्भात सर्व वकीलांना समसमान पध्दतीने अथवा विशिष्ट विभागाचे दावे विशिष्ट वकीलांकडे देणे अथवा विशिष्ठ स्वरुपाचे दावे विशिष्ठ वकीलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

24) पॅनलमध्ये निवड करण्याचे तथा करारनाम्यांतील अटी व शर्तीमध्ये अथवा इतर बाबींसंबंधात वेळोवेळी बदल करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत व यापुढेही राहतील.

**<u>जिल्हा परिषद वकील पॅनलवरील निवड झालेल्या वकीलांना खालीलप्रमाणे अनुज्ञेय फी चे दर:-</u>**

| | **न्यायालयाचा प्रकार** | **रक्कम रु.** |
|---|---|---|
| वकील फी प्रती केस सर्व खर्च मिळुन | 1. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली. | रक्कम रु. 45000/- |
| | 2. मा. उच्च न्यायालय, मुंबई / छ.संभाजी नगर (औरंगाबाद)/ कोल्हापूर/ नागपूर खंडपीठ / मा. महाराष्ट्र न्यायाधिकरण | रक्कम रु. 20000/- |
| | 3. मा.दिवाणी जिल्हा व तालुका वरीष्ठ स्तर न्यायालय / कनिष्ठ स्तर न्यायालय / औद्योगिक व कामगार न्यायालय. | रक्कम रु. 8000/- |

| | | |
|---|---|---|
| लेखी कायदे विषय सल्ला / मत | अ स्तर | रक्कम रु. 3500/- |
| | ब स्तर | रक्कम रु. 2000/- |
| | क स्तर | रक्कम रु. 1000/- |

| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषदेच्या वतीने कॅव्हेट दाखल करणे | अ स्तर | रक्कम रु. 25000/- |
| | ब स्तर | रक्कम रु. 8000/- |
| | क स्तर | रक्कम रु. 3000/- |

जिल्हा परिषद, नाशिक

**ओमकार पवार (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रति,**

जि.प.वकील पॅनलवर नियुक्त करण्यात आलेले सर्व वकीलांना ई-मेलव्दारे

**प्रत :** **<u>माहितीस्तव सविनय सादर.</u>**

01. मा. सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
02. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत :** **<u>माहितीस्तव सविनय सादर.</u>**

01. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
02. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक
03. खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद, नाशिक
04. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नाशिक

2/- सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्याने प्राप्त होणारे न्यायालयीन प्रकरणे सदर आदेशानुसार नियुक्त करण्यात आलेल्या संबंधित वकीलांकडे सुपूर्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच नव्याने नियुक्ती केलेल्या वकीलांना सोपविण्यात येणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांची स्वतंत्र नोंदवही तसेच अभिलेखे ठेवून जतन करण्यात यावेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये पॅनल बाहय वकीलांना वकीलपत्र देण्याची आवश्यकता असल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची लेखी मान्यता घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

जिल्हा परिषद, नाशिक

**ओमकार पवार (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**